Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार
१५.०६.२०२६

वरुड
# दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### बदलापूरमधील 'सिग्नल' आता मराठीत : इंग्रजी शब्दांसह अंकांतही बदल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बदलापूर** - शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्त्यांवर बसविण्यात आलेल्या सिग्नल यंत्रणेत आता मराठीचा वापर करण्यात आला असून, नागरिकांना सिग्नलवर 'थांबा' आणि 'जा' हे शब्द तसेच मराठी अंक पाहायला मिळणार आहेत.

यापूर्वी सिग्नल यंत्रणेत 'स्टॉप' व 'गो' या इंग्रजी शब्दांसह इंग्रजी अंकांचा वापर केला जात होता. मात्र, आता त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. रविवारी (ता. १४) बदलापूर पूर्वेकडील घोरपडे चौक परिसरात नगराध्यक्ष रुचिता घोरपडे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

# 'राऊतांनी ऑपरेशन टायगर नव्हे तर ऑपरेशन गिधाड करावे' : नवनाथ बन यांचा हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका करत 'ऑपरेशन टायगर' ऐवजी 'ऑपरेशन गिधाड' करण्याचा सल्ला दिला.



भाजपा प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषदेत त्यांनी संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली. संजय राऊत यांची प्रवृत्ती गिधाडासारखी असून ते नेहमी इतरांच्या अपयशावर आणि अडचणींवर राजकारण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांचेच 'ऑपरेशन गिधाड' महाराष्ट्रातील जनतेने केले असून त्यांना राजकीयदृष्ट्या मरणासन्न अवस्थेत आणले आहे, असा टोला त्यांनी लगावला.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्याचा कारभार फेसबुक लाईव्ह आणि आभासी माध्यमांतून चालवला गेला, असा आरोप करत बन यांनी सांगितले की, आता त्यांच्याच पक्षातील खासदार व्हर्च्युअल पद्धतीने बैठकींना उपस्थित राहून पक्ष नेतृत्वाला ठेंगा दाखवत आहेत. भविष्यात जनताही त्यांना 'व्हर्च्युअली मतदान' करून घरी बसवेल, असेही ते म्हणाले. मोहन भागवत यांच्या वक्तव्याचे समर्थन

मोहन भागवत यांच्या भारत-पाकिस्तान संबंधांबाबतच्या वक्तव्याचे समर्थन करत बन यांनी सांगितले की, शेजारी राष्ट्रांशी चर्चेतून प्रश्न सोडवणे आवश्यक असते. या भूमिकेवर संजय राऊत यांनी केलेली टीका ही मूर्खपणाची असल्याचे ते म्हणाले.

संजय राऊत पाकिस्तानधार्जिणी भूमिका घेत असल्याचा आरोप करत त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भातील पुरावे मागण्याच्या भूमिकेवरही टीका केली. देशातील जनता भाजपासोबत असून पाकिस्तानविरोधी भूमिका घेते, असेही त्यांनी स्पष्ट केले.


नवनाथ बन यांनी पुढे दावा केला की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात भाजपाला फोडण्यासाठी विविध प्रयत्न झाले. मात्र भाजपाचे कार्यकर्ते, आमदार आणि खासदार हे राष्ट्र प्रथम या विचारसरणीवर काम करतात. त्यामुळे संजय राऊत यांनी शंभर वेळा जन्म घेतला तरी भाजपाचा एक नगरसेवकही फुटणार नाही, असा दावा त्यांनी केला.

# अहिल्यानगरमधील एका धोंड्याला फार मिर्ची लागली : रोहिणी खडसेंची विधानपरिषद सभपतींवर बोचरी टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** - अधिक मास म्हणजेच धोंडे जेवणाच्या कार्यक्रमाचा महिना संपला आहे. मात्र, धोंडे जेवणाच्या कार्यक्रमावरुन भाजप आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चांगलीच जुंपल्याचं दिसून येत आहे.

धोंडे जेवणाच्या कार्यक्रमाची सध्या सोशल मीडियात चांगलीच चर्चा दिसून आली. जावयांनी आणि सासरच्या मंडळींनी कार्यक्रमाचे व्हिडिओ देखील व्हायरल केले आहेत. तर, काही नेतेमंडळींनी आपल्या मतदारसंघातही असे कार्यक्रम घेतले. त्यावरुन, आता विधानपरिषद सभापती राम शिंदे आणि शरद पवाराच्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्यात शाब्दिक वाद रंगल्याचं दिसून आलं.



आम्ही रोजगार मागितला, मूळ प्रश्नावर बोललो तर अहिल्यानगर जिल्ह्यातील एका धोंड्याला फार मिर्ची लागली अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी सभापती राम शिंदे यांच्यावर नाव न घेता केली आहे.

सभापती राम शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी आपल्या मतदारसंघात जाहीर धोंडे जेवणाचा कार्यक्रम घेतला होता. त्यावरून रोहिणी खडसेंनी, धोंडे जेवणाऐवजी रोजगार मेळावा आयोजित करा असा सल्ला राम शिंदे यांना दिला होता. त्यानंतर, राम शिंदे यांनीही रोहिणी खडसे यांच्यावर टीका केली. आता, रोहिणी खडसेंनी पुन्हा एकदा राम शिंदेंवर बोचरी टीका करत प्रत्युत्तर दिल.

रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, आम्ही रोजगार मागितला, मूळ प्रश्नावर बोललो तर अहिल्यानगर जिल्ह्यातील एका धोंड्याला फार मिर्ची लागली. मग धोंड्याने हिंदू संस्कृती जपण्याच्या बाता मारल्या. यांचं हिंदुत्व किती दुटप्पीपणाचे आहे बघा... हे गुंडांना पोसतात, त्यांना देशाबाहेर पळून जाण्यास मदत करतात. ज्या गुंडांनी असंख्य लोकांची हत्या केली, अनेकांना त्रास दिला, त्यांना हे मदत करतात.

# कोस्टल रोड अडीच वर्षांत पूर्ण होणार : मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महत्त्वाकांक्षी 'मुंबई कोस्टल रोड' प्रकल्पाचा उत्तर टप्पा डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली.

प्रकल्पाच्या जागेला भेट दिल्यानंतर मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईतील ६० टक्के वाहतूक वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरून जाते. हायवेवरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी आम्ही नरिमन पॉईंट ते भाईंदर दरम्यान एक विना-सिग्नल रस्ता तयार करत आहोत. आमचा प्रयत्न आहे की हा संपूर्ण प्रकल्प ऑक्टोबर-नोव्हेंबर किंवा डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण होईल. वांद्रे-वर्सोवा टप्पा मार्च २०२८ पर्यंत फडणवीस म्हणाले की, सरकारचे उद्दिष्ट वांद्रे-वर्सोवा टप्पा मार्च २०२८ पर्यंत



पूर्ण करण्याचे आहे, तर वर्सोवा-भाईंदर टप्पा आणि त्याचे कनेक्टर्स डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ते म्हणाले की, मान्सून आणि कोरड्या हवामानाच्या कालावधीसाठी स्वतंत्र योजना तयार करण्यात आल्या आहेत आणि काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी 'वॉररूम' यंत्रणेच्या माध्यमातून या प्रकल्पावर दररोज देखरेख ठेवली जात आहे. कांदळवनांच्या क्षेत्रात वाढ नोंदवणारे एमएमआर एकमेव क्षेत्र! कोस्टल रोड प्रकल्पासाठी होणाऱ्या कांदळवनांच्या (मॅन्ग्रोव्हज) नुकसानीबाबतच्या चिंतेवर फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आणि एमएमआर हे कांदळवनांच्या क्षेत्रात वाढ नोंदवणारे एकमेव आणि वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्र आहे.

### अल्पवयीन युवतीसोबत शारिरीक संबंध प्रस्थापित करुन

# गर्भवती केल्याप्रकरणी घोराडच्या युवकाविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - अल्पवयीन युवतीसोबत पती-पत्नी प्रमाणे गावामध्ये राहून तिचेसोबत शारिरीक संबंध प्रस्थापित करुन तिला गर्भवती केल्याप्रकरणी वरुड पोलिसांनी घोराड येथील देवा लोभकर नामक युवकाविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

घोराड येथील देवा लोभकर हा लग्नाकरीता फिर्यादी अल्पवयीन युवतीच्या गावाला होता. लग्नामध्ये आरोपी व फिर्यादी यांची ओळख होवुन प्रेम



संबंध जुळले त्यानंतर आरोपी याने फिर्यादी हिस आपल्या गावाला पळवुन नेले व आईवडिलांना सांगितले की, मी हिच्या सोबत लग्न कले आहे, ती १८ वर्षाची आहे, असे सांगितले त्यानंतर आरोपी व फिर्यादी हे दोघे एकत्र पती-पत्नी प्रमाणे आरोपीच्या गावात राहले. त्यांच्यात अनेकदा शारिरीक संबंध झाले आहे.

पिडित मुलगी ही अल्पयीन असल्याचे माहीती असुन सुध्दा तिच्या सोबत शारिरीक संबंध ठेवुन तिला ३ महिने गरोदर केल्याने या प्रकरणी सदर १७ वर्षीय अल्पवयीन युवतीच्या फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी देवा दिनेश लोभकर (२१) रा.घोराड याचे विरुध्द कलम ६४ (१), ६४ (२), (ड), भा.न्या.सं.सह कलम ४, ६ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.




### वरुड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये

# शासकीय योजना अंतर्गत मोफत डायलिसिस सुविधा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - वरुड मोर्शी तालुक्यातील, तसेच मध्य प्रदेश परिसरातील मुलताई, पांढुर्णा हृदय रोगाने त्रस्त असणाऱ्या रुग्णांकरिता वरुड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या अंतर्गत मोफत एनजीओप्लास्टी सुरु झाली आहे तसेच डायलिसिस करिता या योजनेअंतर्गत मल्टीस्पेशालिटीमध्ये डायलिसिस करण्यात येत आहे.

डायलिसिस करत असणाऱ्या रुग्णांकरिता प्रथमच वरुड शहरात वरुड मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये डायलिसिस योजने अंतर्गत करण्यात येत आहे. हृदयरोग असणाऱ्या रुग्णांकरीता एन्जोप्लास्टी



सुद्धा वरील योजने अंतर्गत करण्यात येत आहे. एन्जोप्लास्टी दर रविवारी करण्यात येईल तर डायलिसिस रोज करण्यात येईल, अशी माहिती वरुड मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल तर्फे प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

वरुड येथील मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक डायलिसिस सेंटर सुरू झाल्याने परिसरातील मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी डायलिसिस उपचारासाठी रुग्णांना अमरावती किंवा नागपूर येथे जावे लागत होते. त्यामुळे वेळ, प्रवासाचा खर्च आणि शारीरिक त्रास वाढत होता. आता ही सुविधा वरुडमध्ये उपलब्ध झाल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. डायलिसिससाठी वारंवार दूरचा प्रवास करण्याची गरज नसल्याने रुग्णांचा वेळ आणि पैशांची लक्षणीय बचत होणार आहे. तसेच तातडीच्या परिस्थितीतही स्थानिक स्तरावर उपचार मिळणे शक्य होणार आहे. या नव्या सुविधेमुळे वरुड व परिसरातील अनेक रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा आपल्या शहरातच उपलब्ध होणार आहे.



"डायलिसिससारखी अत्यावश्यक आरोग्यसेवा ग्रामीण भागातील रुग्णांना त्यांच्या जवळ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज होती. वरुडमध्ये डायलिसिस सेंटर सुरू झाल्यामुळे आता रुग्णांना उपचारासाठी अमरावती किंवा नागपूर येथे जाण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि शारीरिक त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल. अत्याधुनिक सुविधा आणि तज्ञ वैद्यकीय सेवांच्या माध्यमातून रुग्णांना दर्जेदार उपचार देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील. या सुविधेमुळे वरुड व परिसरातील नागरिकांना मोठा लाभ मिळणार असून आरोग्यसेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात येईल, अशी प्रतिक्रिया वरुड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राम गोधने यांनी व्यक्त केली.



"ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळावी, हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. डायलिसिस सेंटरच्या माध्यमातून आता वरुड आणि परिसरातील रुग्णांना अमरावती किंवा नागपूर येथे जाण्याची गरज भासणार नाही. यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होईल. रुग्णांना आधुनिक व दर्जेदार उपचार स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे, अशी प्रतिक्रिया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ.विजय देशमुख यांनी दिली.

# १४ जूनला वरुड नगरीत रंगणार ‘गुणगौरव व अभिष्टचिंतन’ सोहळा : क्रांतीज्योती ब्रिगेडचा स्तुत्य उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शिक्षणाची पंढरी आणि गुणवंतांची खाण अशी ओळख असलेल्या वरुड नगरीत उद्या पुन्हा एकदा यशाचा गुलाल उधळला जाणार आहे.

क्रांती ज्योती ब्रिगेड वरुड तालुका व शहर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शैक्षणिक क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या १० वी आणि १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २०२६ अत्यंत दिमाखात आयोजित करण्यात आला आहे. हा अभूतपूर्व सोहळा १४ जून रोजी दुपारी ठीक ३ वाजता ए.टी.एल.लॅब, एन.टी.आर.हायस्कूल येथे संपन्न होणार आहे.

या सोहळ्याचा दुग्धशर्करा योग म्हणजे, वरुडचे माजी नगराध्यक्ष तथा क्रांती ज्योती ब्रिगेडचे तालुका सचिव दिनेश खेरडे यांचा ‘अभिष्टचिंतन सोहळा’ देखील याच व्यासपीठावरून साजरा केला जाणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीचा एक आगळावेगळा रंग चढणार आहे. या देखण्या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एन.फुलारी राहतील तर कार्यक्रमाचे उदघाटन प्रसिद्ध सर्जन डॉ.सुधाकर बंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने होणार आहे. विशेष आकर्षण म्हणून, क्रांती ज्योती ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष ॲड.नंदेश अंबाडकर यांची विशेष




उपस्थिती संपूर्ण कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारी ठरेल.

विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आणि दिनेश यांना शुभेच्छा देण्यासाठी वरुडमधील अनेक नामवंत विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ एकाच मंचावर येणार आहेत. यामध्ये एन.टी.आर.हायस्कूलचे माजी प्राचार्य पी.एल.कळमकर, एन.टी.आर.हायस्कूलचे प्राचार्य योगेश बरडिया, जागृत विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आडे, डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे, जिल्हाध्यक्ष, क्रांती ज्योती ब्रिगेड अमरावती सुभाष मालपे तसेच युवा जिल्हाध्यक्ष, क्रांती ज्योती ब्रिगेड, अमरावती किरण खवले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा वैचारिक आणि कौतुकाचा एक अभूतपूर्व सोहळा ठरणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती ब्रिगेड अमरावतीचे जिल्हा संघटक व कार्याध्यक्ष विनय चौधरी यांच्या ओघवत्या प्रास्ताविकाने तर संचालन सचिव निता पाटील या करतील.

विद्यार्थ्यांच्या पाठीवर पडणारी कौतुकाची थाप ही त्यांच्या भविष्यातील यशाची पायाभरणी असते आणि समाजकार्यात झोकून देणाऱ्या नेतृत्वाचा सत्कार करणे हे आपले कर्तव्य आहे, अशी भावना क्रांती ज्योती ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष प्राचार्य किशोर तडस यांनी व्यक्त केली आहे. या उदात्त हेतूने आयोजित केलेल्या सोहळ्याला वरुड शहर व परिसरातील सर्व सुज्ञ नागरिक, माता-भगिनी, विद्यार्थी, पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे अगत्याचे आवाहन तालुकाध्यक्ष प्राचार्य किशोर तडस आणि क्रांती ज्योती ब्रिगेडच्या वरुड तालुका व शहर पुरुष आणि महिला कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुण्यात शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

**२८ ते ३१ जानेवारी २०२७ दरम्यान आयोजन**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात दि.२८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.



हे संमेलन चार दिवसांचे असून ते ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली. महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. संमेलनाचे संयोजक, समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, ‘मसापा’च्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर या बैठकीला उपस्थित होते. तत्पूर्वी, शनिवारी स्थळ निवड समितीने एस. पी. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती. बैठकीत विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# उन्हाळी सुट्टी संपली : आजपासून शाळांची घंटा वाजणार!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – उन्हाळी सुट्टीनंतर राज्यातील शाळांची घंटा सोमवारपासून पुन्हा वाजणार आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची आता सुरुवात होत आहे.



मुंबई मनपाच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या सर्व शाळा सोमवार, १५ जून रोजी पुन्हा सुरू होणार आहेत. शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करणे आणि पटसंख्या (नावनोंदणी) वाढवणे या उद्देशाने राज्यव्यापी उपक्रमाचा भाग म्हणून सर्व पालिका शाळांमध्ये विशेष ‘शाळा प्रवेशोत्सव’ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, शाळा सुरू होणार असल्याने पालकांनी शालेय वस्तूंच्या खरेदीसाठी रविवारी मोठी गर्दी केली होती.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा सोमवारी सकाळी ११ वाजता भायखळा (पूर्व) येथील घोडपदेव येथील बीएमसी शाळा संकुलातील ’मुंबई पब्लिक स्कूल’मध्ये आयोजित प्रवेशोत्सव कार्यक्रमाला भेट देणार आहेत.

या कार्यक्रमाला उपमहापौर संजय घाडी, शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ.अविनाश ढाकणे, स्थानिक नगरसेवक रमाकांत रहाटे आणि उपआयुक्त (शिक्षण) डॉ.प्राची जांभेकर उपस्थित राहणार आहेत. विदर्भ वगळता, १५ जून रोजी महाराष्ट्रात ‘शाळा प्रवेशोत्सव २०२६’ साजरा केला जाईल. प्रत्येक मुलाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढवणे आणि शाळेचा पहिला दिवस एका संस्मरणीय आणि उत्सवाच्या प्रसंगात बदलणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



**स्व.केशवरावजी क्षीरसागर जागृत विद्यालयात**

# गुरु-शिष्य स्नेहमिलन सोहळा उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लोणी** – जागृत नवयुवक शिक्षण संस्था वरुड संचालित स्व.केशवरावजी क्षीरसागर जागृत विद्यालय येथे बॅच २००९-१० च्या माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने गुरु-शिष्य स्नेह मिलन सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पी.टी.मुंदाणे तर प्रमुख अतिथी म्हणुन माजी मुख्याध्यापक बी.जी.शिरभाते, विनोद रासेगावकर साहेबराव पेठे, रत्नमाला मालपे, अमित देशमुख, दीपक दुपारे, निळकंठ नेरकर, वैशाली लाड, रंजना काळकर, आशिष हिंगणे, हर्षाली नेरकर, पवन विघे, अश्विनी पाचघरे, सुरेश उइके, अरविंद देशमुख, अनिल पोहरकर, रोशन उइके, अनिता पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन दीपप्रज्वलन व हारार्पन करून करण्यात आली.त्यानंतर जुन्या आठवणींना उजाळा देत वर्ग शिक्षक अमित देशमुख यांनी सर्वांची हजेरी घेतली

यावेळी माजी मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला तसेच शालेय आठवणींना उजाळा दिला. प्रमुख अतिथींनी कार्यक्रमाचे कौतुक करुन गुरु-शिष्य नाते अधिक दृढ होण्याच्या शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात पी. टी. मुंदाणे यांनी गुरु-शिष्य नाते हे ज्ञान, विश्वास व समर्पणाचे अतूट बंधन असल्याचे सांगितले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ व स्वरुची भोजनाने कार्यक्रमाची रंगत वाढली. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी. टी.मुंदाणे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी स्वरुची भोज,विविध खेळ, नृत्याचे आयोजन करण्यात आले. खेळाचे संचालन अंकिता मालपे, सोनाली पंधरे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीवनी विघे तर आभार वैशाली नेरकर हिने मानले.

याप्रसंगी पूजा पोटफफोडे, मोनाली नेरकर, अफसाना शेख, अश्विनी पाचघरे, अंकिता मालपे, जयश्री देवघरे, अश्विनी शिरभाते, वैशाली नेरकर, सोनाली पंधरे, कांचन राईकवार, कल्याणी पोहरकर, संजीवनी विघे, सुवर्णा आगरकर, प्रांजली क्षीरसागर, ऋशाली उंदरे, हर्षाली बोडखे, तेजस्विनी वानखडे, सुचिता कापसे, अंकिता नेरकर, आरती काकडे, करिष्मा मालपे, प्रीती खुजे, श्रुतिका तटटे, जया ठाणेकर, वंदना वानखडे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

# तापलेल्या जळगावात बिअर विक्रीत वाढ


(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***जळगाव*** – यंदाच्या उन्हाळ्यात जळगाव जिल्ह्यात तापमानाचा पारा ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने उष्णतेपासून दिलासा मिळविण्यासाठी जळगावकरांनी एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत तब्बल २५ लाख ३५ हजार १४६ लिटर बिअरचे सेवन केले. गेल्या वर्षाच्या तुलनेत एप्रिल महिन्यात बिअर विक्रीत २६ टक्के, तर मे महिन्यात ३९ टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जळगावचे अधीक्षक डॉ.विठ्ठल भुकन यांनी दिली. जिल्ह्यात यंदा वाढलेल्या तापमानामुळे रात्री उशिरापर्यंत उष्णतेच्या झळा जाणवत होत्या. परिणामी देशी मद्याच्या विक्रीवर मात्र फारसा परिणाम झालेला नसून एप्रिल आणि मे या दोन्ही महिन्यांत प्रत्येकी तीन टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. या दोन महिन्यांत मद्यप्रेमींनी २५ लाख ८ हजार ३३० लिटर देशी मद्याचे सेवन केल्याची नोंद आहे.

# पत्नीसह दोन चिमुकल्यांना विहिरीत ढकलून घेतला गळफास

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वाशिम*** – वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील तिवळी गावात एकाच कुटुंबातील चौघांच्या मृत्यूची धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना घडली. एका व्यक्तीने प्रथम पत्नी आणि दोन मुलांना विहिरीत ढकलून दिले व त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. मात्र, मृत महिलेच्या भावाने या घटनेबाबत संशय व्यक्त केला असून, हा आत्महत्येचा प्रकार नसून घातपात असल्याचा आरोप केला आहे. वाशिम जिल्ह्यातील तिवळी गावात घडलेल्या या घटनेत, संतोष तुकाराम बकाल (३५) यांनी आपली पत्नी तसेच मुलगी जान्हवी (७) आणि मुलगा सोहम (५) यांना विहिरीत ढकलून दिल्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे.



चौघांच्या मृत्यूबाबत घातपाताचा संशय या दुर्दैवी घटनेमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असले तरी, मृत महिलेच्या भावाने हा आत्महत्येचा प्रकार नसून घातपात असल्याचा आरोप केला आहे.

**पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांची**

# पेस आयआयटी व मेडिकल इन्स्टिट्यूटला सदिच्छा भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – पंचायत समिती वरुड येथील गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी पेस आयआयटी व मेडिकल इन्स्टिट्यूटला सदिच्छा भेट दिली.

यावेळी संस्थेतील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तसेच आयआयटी गएए नीट परीक्षांच्या तयारीसंदर्भातील विविध सुविधा यांची माहिती त्यांनी जाणुन घेतली. संस्थेच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची



सविस्तर माहिती दिली. गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी संस्थेतील शैक्षणिक वातावरण, उपलब्ध सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या वतीने भेटीदरम्यान शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी विद्यार्थ्यांना आजच्या युगातील स्पर्धा आणि आव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले. पेस आयआयटी व मेडिकल इन्स्टिट्यूट हा भविष्यात विद्यार्थ्यांना आपली स्वप्ने साकार करण्याकरिता उत्तम व्यासपीठ असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनामधून व्यक्त केले.

याप्रसंगी पेस आयआयटी व मेडिकलचे व्यवस्थापक भुषण गवई, प्रा.विकास पटेल भौतिकशास्त्र विभाग आयआयटी भुवनेश्वर, प्रा.प्रिन्स गौतम आयआयटी रोपर, रसायनशास्त्र विभाग, प्रा.सतीश कुमार सिंग एनआयटी गणित विभाग, प्रा.अर्चना फुटाणे जीवशास्त्र विभाग, आकाश बाहे सह व्यवस्थापक, विराग म्हस्की समुपदेशक, मयुरी धवड, अकॅडमीक समन्वयक, मयुरी ढोक समुपदेशक, दीपक नाडगे अकाऊंटंट मयूर चौरासे, लोकेश शेळके, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्येने विद्यार्थी तसेच पालकांची उपस्थिती होती.

# संपादकीय

चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.

## माहितीचा भडीमार की ज्ञानाचा शोध? वस्तूनिष्ठ शिक्षणाचे वास्तव

‘शिक्षण फक्त माहिती देण्याची प्रक्रिया नाही; ते विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा, विचार आणि आनंद निर्माण करण्याची कला आहे.’ हे सुभाषित ऐकायला जितके सुंदर, आदर्श आणि मार्गदर्शक वाटते, तितकेच ते आजच्या वर्तमानातील शिक्षण व्यवस्थेच्या कडू वास्तवापासून मैलोनमैल दूर असल्याचे जाणवते. आजचे शिक्षण हे विद्यार्थ्याला ‘विचारवंत’ बनवण्याऐवजी केवळ ‘माहितीचा साठा’ करणारा एक रोबो किंवा स्पर्धात्मक यंत्र बनवत आहे की काय, अशी भीती वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. परीक्षा, गुण, टक्केवारी आणि पॅकेजच्या या अंधाधुंद शर्यतीत विद्यार्थ्यांमधील उपजत जिज्ञासा, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता आणि शिकण्याचा निखळ आनंद कुठेतरी हरवून गेला आहे, हे आजचे कटू आणि विदारक वास्तव आहे.माहितीचा महापूर आणि समजशक्तीचा दुष्काळआज आपण माहितीच्या युगात जगत आहोत. इंटरनेट, गुगल, कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे. दुर्दैवाने, आपली शिक्षण व्यवस्था अजूनही त्याच माहितीची घोकंपट्टी करून घेण्यावर भर देत आहे. पाठ्यपुस्तकात जे लिहिले आहे, ते जसेच्या तसे पाठांतर करणे, परीक्षेत ते उतरवणे आणि जास्तीत जास्त गुण मिळवणे, एवढ्यापुरतेच शिक्षण मर्यादित झाले आहे.माहिती मिळवणे आणि ज्ञान मिळवणे यात खूप मोठा फरक आहे. माहिती ही केवळ घटकांची किंवा आकड्यांची जुळवाजुळव असते, तर ज्ञान हे त्या माहितीचे आकलन, विश्लेषण आणि तिचा जीवनात केलेला योग्य वापर असतो. आज शाळा-महाविद्यालयांमधून माहितीचा भडीमार तर प्रचंड प्रमाणात होत आहे, परंतु त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याची प्रक्रिया मात्र थांबलेली दिसते. परिणामी, पदव्या घेतलेले तरुण बाजारात येत आहेत, पण त्यांच्याकडे व्यावहारिक ज्ञान, समस्या सोडवण्याचे कौशल्य आणि कल्पकता यांचा प्रचंड अभाव जाणवतो.जिज्ञासेचा गळा घोटणारी व्यवस्थालहान मूल जेव्हा शाळेत पाऊल ठेवते, तेव्हा त्याच्या मनात निसर्गाबद्दल, अवतीभवतीच्या जगाबद्दल हजारो प्रश्न असतात. ‘असे का?’, ‘तसे का नाही?’ ही त्याची उपजत जिज्ञासा असते. आदर्श शिक्षण व्यवस्थेने या जिज्ञासेला खतपाणी घालून त्याचा विस्तार करायला हवा. परंतु, आजच्या चौकटीत बद्ध असलेल्या शिक्षण पद्धतीत अशा प्रश्नांना फारसा वाव नसतो.अभ्यासक्रमाचा अवाजवी ताण: शिक्षकांना ठराविक वेळेत अभ्यासक्रम संपवण्याची घाई असते.चौकटीबाहेरील विचारांना नकार: एखादा विद्यार्थी जर पुस्तकाबाहेरचा किंवा चौकटीबाहेरचा प्रश्न विचारत असेल, तर बऱ्याचदा त्याला गप्प बसवले जाते किंवा 'हे परीक्षेत येणार नाही' असे सांगून त्याचे कुतूहल दाबले जाते.घोकंपट्टीचे उदात्तीकरण: जो विद्यार्थी प्रश्न न विचारता गुपचूप पाठांतर करतो, त्याला 'शहाणा' म्हटले जाते.या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमधील प्रश्न विचारण्याची आणि शोध घेण्याची प्रवृत्ती म्हणजेच ‘जिज्ञासा’ हळूहळू मरून जाते. ज्या देशातील तरुण पिढी प्रश्न विचारायचे विसरते, त्या देशात नवीन शोध, संशोधन आणि वैचारिक क्रांती कशी घडू शकते?विचारांचे साचेबद्धीकरणशिक्षणामुळे माणसाला स्वतंत्रपणे विचार करता आला पाहिजे. योग्य काय आणि अयोग्य काय, याचा विवेक जागा झाला पाहिजे. परंतु आजची शिक्षण व्यवस्था विचार करायला शिकवण्याऐवजी 'काय विचार करावा' हे ठरवून देते. पूर्वग्रहदूषित अभ्यासक्रम, केवळ परीक्षेकेंद्रित दृष्टिकोन यामुळे विद्यार्थ्यांची विचारप्रक्रिया साचेबद्ध झाली आहे.कोणत्याही विषयाच्या मुळाशी जाऊन, त्याचे वेगवेगळ्या बाजूंनी विश्लेषण करण्याची सवय विद्यार्थ्यांना लावली जात नाही. यामुळेच समाजात आज सोशल मीडियावरील अफवांवर डोळे झाकून विश्वास ठेवणारा, वैचारिक परिपक्वता नसलेला एक मोठा वर्ग तयार होत आहे. स्वतःचे मत स्वतंत्रपणे मांडणे, इतरांच्या मतांचा आदर करणे आणि तर्कशुद्ध वादविवाद करणे ही कौशल्ये आजच्या पदवीधरांमध्ये दुर्मिळ झाली आहेत. विचार करण्याची ही जडणघडण जर शाळा-कॉलेजांमध्ये झाली नाही, तर ती पुढे कधीच होत नाही.आनंदाऐवजी चिंतेचे साम्राज्यशिकणे ही एक आनंददायी प्रक्रिया असायला हवी. नवीन काहीतरी समजून घेताना मनाला होणारा आनंद हा अद्भुत असतो. परंतु आज विद्यार्थ्यांसाठी शाळा किंवा महाविद्यालय हे आनंदाचे ठिकाण न राहता एक 'तणाव केंद्र' बनले आहे.शिक्षणाचा आदर्श आजचे कडू वास्तवमनात जिज्ञासा निर्माण करणे.प्रश्न विचारण्यावर मर्यादा, फक्त पाठांतरावर भर.स्वतंत्र विचार करण्याची क्षमता देणे.गुणांच्या आणि रँकिंगच्या साच्यात बांधणे. शिकण्याचा निखळ आनंद देणे.परीक्षा, स्पर्धा आणि भविष्यातील पॅकेजचा मानसिक ताण. सकाळपासून सुरू होणारी शाळा, रात्री उशिरापर्यंत होमवर्क आणि प्रोजेक्ट्स या चक्रात विद्यार्थ्यांचे बालपण आणि तारुण्य करपून चालले आहे.

# ‘बदलतं वय, बदलतं नातं’

डॉक्टर, आमचा मुलगा आमच्या हातातुन निसटतोय असं वाटतंय... आई चिंतातूर स्वरात बोलत होती. ती पुढे म्हणाली, आधी तो खूप छान होता. अभ्यास करायचा, आमच्याशी संवाद साधायचा; पण आता काहीच ऐकत नाही. सतत मोबाईलमध्ये असतो. काही सांगितलं तर लगेच चिडतो, उलट उत्तर देतो. आम्ही कुठे चुकतोय हेच कळत नाही. समोर बसलेल्या १५ वर्षीय मुलाकडे माझी नजर गेली. चेहऱ्यावर निरागसता होती; पण डोळ्यांत नाराजी स्पष्ट दिसत होती. आईला काही वेळ बाहेर बसण्यास सांगून मी त्याच्याशी संवाद साधू लागलो. आई-वडिलांविषयी विचारल्यावर तो थोडा वेळ शांत राहिला आणि मग म्हणाला, घरी कोणीच मला समजून घेत नाही. सगळे फक्त माझ्यावर ओरडतात. आज अनेक कुटुंबांमध्ये हीच परिस्थिती वेगवेगळ्या स्वरुपात दिसून येते. अनेक पालक म्हणतात, आजची पिढी बदलली आहे, तर मुलांचे म्हणणे असते, आम्हाला कोणी समजून घेत नाही. खरं तर इथे कोण चुकतंय हा प्रश्न नसून, हे का घडत आहे हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

किशोरावस्था हा आयुष्यातील अत्यंत संवेदनशील आणि बदलांनी भरलेला टप्पा असतो. या काळात शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक स्तरांवर झपाट्याने बदल घडत असतात. संप्रेरकांमधील बदलांमुळे भावनांची तीव्रता वाढते. त्याचबरोबर निर्णय घेण्यासाठी जबाबदार असलेला मेंदूचा भाग अद्याप पूर्ण विकसित झालेला नसतो; तर भावना नियंत्रित करणारा भाग अधिक सक्रिय झालेला असतो. त्यामुळे या काळाला ‘भावनिक वादळाचा काळ’ असेही म्हटले जाते. या वयातील मुलांच्या मनात सतत काही प्रश्न घोंगावत असतात माझे स्वतंत्र अस्तित्व आहे का? लोक मला कसे पाहतात? मी सक्षम आहे का? ही स्वतःची ओळख शोधण्याची प्रक्रिया असते. त्यामुळे ते कधी पालकांना विरोध करतात तर कधी स्वतःमध्येच हरवुन जातात. प्रत्येक मुल वेगळे असते; मात्र काही समान मानसिक प्रवृत्ती बहुतेक मुलांमध्ये दिसून येतात.

**किशोरवयीन मुलांचे काही प्रकार –**

**विरोध करणारी मुले –** ही मुले सतत प्रश्न विचारतात, नियमांना आव्हान देतात आणि उलट उत्तर देतात. पालकांना ती हट्टी वाटतात परंतु प्रत्यक्षात त्यांना स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करायचे असते. **अलिप्त राहणारी मुले –** ही मुले शांत असतात, कमी बोलतात आणि स्वतःमध्येच रमलेली दिसतात. त्यांना आपले विचार किंवा भावना व्यक्त करणे सुरक्षित वाटत नाही. अशी मुले सहसा अधिक संवेदनशील असतात. **सर्वांना खूश ठेवणारी मुले –** ही मुले बाहेरुन अत्यंत शिस्तबद्ध आणि परिपुर्ण वाटतात. ती सर्वांचे ऐकतात, विरोध करत नाहीत आणि प्रत्येक काम व्यवस्थित करतात. मात्र आतुन त्यांना सतत भीती वाटत असते की, मी चांगला राहिलो नाही तर लोक मला स्विकारणार नाहीत. **अतिविचार करणारी मुले –** भविष्यासंबंधी सतत चिंता करणे, छोट्या गोष्टींचा मोठा विचार करणे आणि प्रत्येक गोष्टीबाबत काळजी वाटणे ही यांची वैशिष्ट्ये असतात. त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना दडलेली असते. **लक्ष वेधुन घेणारी मुले –** ही मुले हट्टी किंवा नाटकी वाटु शकतात. सामाजिक माध्यमांवर ती अधिक सक्रिय असतात. माझ्याकडे बघा, मला महत्त्व द्या, ही त्यांची अंतर्मनातील गरज असते.

किशोरवयीन मुलं कसे घडते हे फक्त त्याच्यावर अवलंबून नसते तर पालकांचा दृष्टिकोन हा खूप मोठी भूमिका बजावतो.सगळे पालक सारखे नसतात पण पालकांचे देखील काही सामान्य मानसिक नमुने बघायला मिळतात.

**नियंत्रक पालक –** हे पालक मुलांच्या प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप करतात. कोणते कपडे घालायचे, कुठे जायचे, कोणाशी बोलायचे यावर नियंत्रण ठेवतात. अशा वातावरणात मुले बंडखोर बनू शकतात किंवा खोटे बोलू लागतात. **भावनिकदृष्ट्या दूर असणारे पालक –** हे पालक शारीरिकदृष्ट्या उपस्थित असतात परंतु भावनिकदृष्ट्या अनुपस्थित असतात. त्यामुळे मुले भावनिक आधारासाठी इतरत्र संबंध शोधू लागतात. **अतिकाळजी करणारे पालक –** हे पालक मुलांना स्वतः निर्णय घेऊ देत नाहीत. परिणामी मुलांमध्ये आत्मविश्वास कमी राहतो आणि अतिविचार करण्याची प्रवृत्ती वाढते. **सतत टीका करणारे पालक –** असे पालक मुलांच्या चुका शोधतात आणि इतरांशी तुलना करतात. त्यामुळे मुलांमध्ये न्युनगंड निर्माण होतो आणि सर्वांना खूश ठेवण्याची वृत्ती वाढते. **संतुलित पालक –** हे पालक मार्गदर्शनासोबत स्वातंत्र्यही देतात. ते मुलांचे ऐकुन घेतात, त्यांच्या भावना समजून घेतात आणि आवश्यक मर्यादाही निश्चित करतात. अशा वातावरणात मुले भावनिकदृष्ट्या सक्षम बनतात. **आदर्श पालक होण्यासाठी काय कराल?** मुलांच्या केवळ भौतिक गरजा पूर्ण करणे पुरेसे नसते; त्यांच्या मानसिक गरजांची पूर्तता करणेही तितकेच महत्त्वाचे असते. मुलांना नियंत्रणाची नव्हे, तर भावनांचे योग्य व्यवस्थापन शिकविण्याची गरज असते, अनेकदा मुलांना उपाय नको असतो; त्यांना फक्त कोणी तरी मनापासून ऐकणारा हवा असतो, त्यांच्या भावनांना मान्यता द्या. तुला असं वाटणं स्वाभाविक आहे, हे वाक्य त्यांना सुरक्षिततेची भावना देते. रागाने प्रतिक्रिया देण्याऐवजी शांतपणे प्रतिसाद द्या. इतर मुलांशी तुलना करणे पूर्णपणे टाळा. दररोजचा दहा मिनिटांचा दर्जेदार संवाद एक तासाच्या समजावण्यापेक्षा अधिक प्रभावी ठरतो. मुलांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व स्विकारा. त्यांची मते विचारात घ्या आणि त्यांचा आदर करा, छोट्या-छोट्या जबाबदाऱ्या द्या, जसे की स्वतःचे कपडे आवरणे, शालेय साहित्य सांभाळणे किंवा घरातील साधी कामे करणे. त्यांच्या आवडी-निवडी, कला, क्रीडा आणि छंदांना प्रोत्साहन द्या.

**शेवटचा विचार –** एक महत्त्वाचे सत्य लक्षात घ्या मुलं आपल्या अपेक्षेप्रमाणे वागत नाहीत, ही समस्या नसते; तो त्यांच्या मनातील एक संदेश असतो. मला समजून घ्या... माझे ऐका... माझ्या अस्तित्वाचा स्वीकार करा...

पालकांनी हा संदेश समजून घेतला तर पालक आणि मुलांमधील नाते अधिक दृढ होऊ शकते. आजच्या पिढीला कदाचित सल्ल्यापेक्षा समजून घेण्याची अधिक गरज आहे. आपण मुलांना बदलण्याचा प्रयत्न करतो; पण त्यांना बदलण्यासाठी सर्वप्रथम स्वतःमध्ये बदल घडवावा लागतो, हे विसरुन चालणार नाही. आपल्याकडून काय अपेक्षित असते याचा कधी विचार केलाय का? सामान्यपणे आपण आपल्याला वाढवताना आपल्या आईवडिलांकडून जशी वागणुक मिळाली त्याला गींवसश करुन आपण स्वतःच्या मुलाला वाढवायचे ठरवतो.जे की काही अंशी खरे आहे.मुलांच्या मूलभूत भौतिक गरजा पूर्ण करण्याबरोबर मूलभूत मानसिक गरजा पुर्ण करणे अत्यंत गरजेचे आहे.यासाठी आदर्श पालक होण्यासाठी पालकांनी काय बदलायला हवं? एक सत्य समजुन घ्या की मुलांचे तुमच्या अपेक्षेप्रमाणे न वागणे ही समस्या नाही तर तुमच्यासाठी त्यांच्याकडुन एक मेसेज असतो. मला समजून घ्या, माझे ऐकुन घ्या, मला माझ्या अस्तित्वाचा स्वीकार हवा आहे. जर पालकांनी हा मेसेज समजुन घेतला तर पालक बालक नाते पुर्णपणे बदलु शकते. कदाचित आजच्या पिढीला सल्यापेक्षा समजुन घेण्याची जास्त गरज आहे. ते फक्त याचीच वाट पाहत असतात.पालक म्हणुन आपण मुलांना बदलण्याचा प्रयत्न करतो पण त्यांना बदलण्यासाठी आपल्या आधी बदलावं लागत हे आपण विसरतो.



**डॉ.शिवा माया पंजाबराव पुंडकर**
**मनोविकास तज्ञ,संमोहन तज्ञ, पुरस्कार प्राप्त समुपदेशक व प्रशिक्षक, अमरावती**
**७३७८८६६५५५.**

# मानवी आरोग्य सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी ‘तुकाराम’ची गरज

दुमानवी आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नसून ती व्यक्तीची संपुर्ण शारीरिक, मानसिक आणि सामाजिक सुस्थितीची अवस्था आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार मानवी आरोग्यामध्ये या तिन्ही घटकांचा समतोल असणे अत्यंत आवश्यक असल्याचे मानले जाते. सद्यस्थितीत आरोग्य हा विषय प्रत्येकांसाठीच अत्यंत संवेदनशील बनला आहे. आपले आरोग्य सुदृढ व निरोगी राहावे यासाठी समाजातील बहुतांश व्यक्ती नियमित व्यायाम व संतुलित आहार घेत असतात परंतु हल्ली आपण आपल्या दैनंदिन आयुष्यात घेत असलेल्या आहारातील पदार्थ किती भेसळयुक्त आहेत याची कल्पनाही आपण करु शकत नाही आणि या सर्व भेसळयुक्त पदार्थांमुळे मानवी आरोग्य धोक्यात आले की काय ? असा प्रश्न उभा राहतो. अशा भेसळयुक्त अन्नपदार्थांच्या सेवनामुळे शरीरावर तात्काळ आणि दीर्घकालीन अत्यंत गंभीर दुष्परिणाम होतात, ज्यामध्ये पचनसंस्थेचे आजार, कर्करोग (कॅन्सर), यकृत (लिव्हर) व मुत्रपिंड (किडनी) निकामी होणे आणि हृदयविकार यांसारख्या जीवघेण्या आजारांना सामोरे जावे लागते. ही फार चिंतेची व चिंतनाची बाब असलेली दिसून येते.

‘समस्या तिथं निराकरण’ या म्हणीला यथार्थ ठरवत तुकाराम मुंढे हे नाव निश्चितच मानवी आरोग्यासाठी देवदूत ठरलं असे म्हणणे गैर होणार नाही. तुकाराम मुंढे हे असं एक नाव आहे जे पांढऱ्या कपड्यावाल्यांना व व्हाईट कॉलर वाल्यांना सहजासहजी पचत नाही. गेल्या काही काळापासून अन्न आणि औषध प्रशासन खात भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन चर्चेत आले होते. लाचखोरी आणि इतर भ्रष्ट कामांमुळे चर्चेत असलेल्या अन्न आणि औषध प्रशासनात आता आयुक्त म्हणुन तुकाराम मुंढेंची बदली करण्यात आली आहे. कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणुन ओळखले जाणारे आयएएस तुकाराम मुंढे यांनी नुकताच अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्विकारला. मुंढे यांनी आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताच त्यांनी भ्रष्ट व नियमबाह्य काम करणाऱ्यांना जेरीस आणुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याला सुरुवात केली. ज्या दही, दुध पनीरला हाडांच्या मजबुतीचा खजिना म्हणुन ओळखलं जायचं त्याचं दही, दुध पनीरमध्ये प्रचंड भेसळ असल्याचे मुंढे यांनी शोधून काढले आणि यामुळेच दिवसेंदिवस मानवी आरोग्याच्या तक्रारी वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



एवढेच नव्हे तर ज्या पिढीवर सशक्त भारत घडविण्याची जबाबदारी आहे, त्यांना पान मसाला गुटख्याच्या विळख्यातुन बाहेर काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न मुंढे यांचा सुरु आहे. हीच विदारक परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तुकाराम मुंढे सारख्या प्रामाणिक व निष्ठावान अशा अनेक अधिकाऱ्यांची गरज आहे कारण आमच्याच काही नतद्रष्ट्यांनी अखखा महाराष्ट्र आज नासवुन ठेवला आहे. भेसळखोरांची दुकानदारी उध्वस्त करण्यासाठी तुकाराम मुंडेसारख्या कर्तबगार अधिकाऱ्यांचीच गरज आज संपुर्ण महाराष्ट्राला असल्याचे दिसते. सगळ्यांना तुकाराम हवा आहे परंतु आपल्याला तुकाराम का बनायचे नाही? याचेही आत्मचिंतन करणे गरजेचे आहे असे वाटते. अशा या वाढत्या भेसळयुक्त पदार्थांमुळे अनेक गोर-गरीब कुटुंबामध्ये अगदी लहान्यांपासून ते वृद्धांमध्ये वाढत असलेले विविध आजारांचे साम्राज्य हे खरोखरचं चिंतेची बाब असलेली दिसून येते. सुखी व समृद्ध अशी ओळखं असणाऱ्या महाराष्ट्रामध्ये लोकांच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार कधी थांबेल? हा हल्ली सगळ्यांनाच पडलेला प्रश्न आहे.

अवघ्या महिन्याभराच्या आत राज्यातील ३४ ठिकाणी गुटखा, पानमसाला आणि तत्सम विक्री प्रकरणांमध्ये २५ एफआयआर दाखल झाले असून ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पॅकबंद पिण्याचे पाणी, दुध, नुडल्स, कार्बोनेटेड वॉटर, खाद्यतेल, स्वीट व फरसाण, आईस्क्रीम, ताडी, डिंक, मसाले, खवा, पनीर, तुप, बेसन आणि बेकरी पदार्थांचा सुमारे २८.७८ लाखांचा साठा जप्त करण्यात आला आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा आस्थापनाला प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भेसळ, प्रतिबंधित पदार्थांची विक्री आणि असुरक्षित अन्न उत्पादनाविरोधातील कारवाई यापुढे अधिक कठोर आणि सातत्यपुर्ण राहील असा इशारा सुद्धा तुकाराम मुंढे यांनी भेसळ करणाऱ्या तस्करांना दिला. प्रशासनात व्यवस्थेच्या प्रवाहाविरुद्ध काम करणे हे फार मोठे आव्हान असते परंतु तुकाराम मुंढे हा निष्ठावान व प्रामाणिक अधिकारी आपली नैतिकता कायम ठेवुन अशा अनेक आव्हानांना सामोरे जात आपली कर्तव्य पार पाडत आहे याचा संपूर्ण महाराष्ट्राला सार्थ अभिमान आहे. सत्यासाठी उभं राहायला वाघाच काळीज लागतं आणि याच काळजाने मुंढे साहेब आजवर कार्य करीत आहे. पंचवीस वर्षात २५ बदल्या ही त्यांच्या कार्याची पोच पावती समजायची का? असा प्रश्नही अनेकांच्या मनात निर्माण होतो. या वास्तवतेच्या या विखारी जगात खरा नायक बनुन, प्रत्येक नवीन दिवसाची नवी लढाई समजुन, प्रत्येक प्रामाणिक पावलांच्या मागे धमक्यांचा सुर सहन करून सुद्धा आपले कार्य आणखी कसे तेजस्वी करता येईल याचा मनोमन विचार तुकाराम मुंढे करतात. महाराष्ट्रात ‘मानवी आरोग्य ’ हा विषय आणखी समृद्ध करायचा असेल तर तुकाराम मुंढे सारख्या प्रामाणिक व निष्ठावान अधिकाऱ्याची आजही नितांत गरज आहे.



**प्रा.वैभव जिसकार**
**अमरावती**
**९१३०४५१९४९**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ‘मोदींना रोखण्यासाठी राहुल गांधी हाच एकमेव पर्याय’



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – विधान परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. अमरावती विधान परिषदेच्या जागेवरून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक मोठा दावा केला आहे. ‘भाजपने अमरावतीत दिलेल्या उमेदवारावरून भाजपमध्येच प्रचंड नाराजी असून, यामुळे भाजपची मते फुटू शकतात,‘ असा दावा त्यांनी केला आहे.

मोदींना रोखण्यासाठी राहुल गांधी हाच एकमेव पर्याय असल्याचे वक्तव्य देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. ’पैसा फेक तमाशा देख’; सपकाळांचा गंभीर आरोप राज्यात विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस उमेदवारांची पीछेहाट होताना पाहायला मिळत आहे, या प्रश्नावर उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ आक्रमक झाले. ते म्हणाले, ‘पैसा फेक तमाशा देख, या धर्तीवर सत्ताधाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवल्या. या निवडणुकीमध्ये विरोधकांचे उमेदवारी अर्ज तांत्रिक दबावापोटी त्यांनी बाद करून घेतले. कॉलर पकडून आणून उमेदवारांना अर्ज मागे घ्यायला लावले आणि मोठ्या प्रमाणावर मतदारांना पैसा दिला. त्यातून हा मतदार पुढे येत असताना मतदारांची संख्या कमी आहे. साम-दाम-दंड-भेद या नीतीचा वापर करत असताना सत्ताधारी या निवडणुकीत थैमान घालत आहेत,‘ असा आरोप त्यांनी केलाय. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ममता बॅनर्जींचा तृणमूल काँग्रेस पक्ष काँग्रेसच्या मार्गावर असून त्यांचे विलिनीकरण होणार, अशा चर्चा सध्या राजकीय वतुर्ळात सुरू आहेत.

# पिकअप विहिरीत कोसळून ८ ठार : ६ जण गंभीर जखमी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## मृतांचा आकडा वाढण्याची भीती, मृतांमध्ये ५ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश

**सोलापूर** – सोलापूर जिल्ह्यातील माळिशरस तालुक्यात रविवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. म्हसवड-पंढरपूर मार्गावरील तांदूळवाडी गावाजवळ सुतार टेकडी येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत भाविकांना घेऊन जाणारी पिकअप गाडी कोसळल्याने ८ जण ठार झाले असून ६ जण गंभीर



जखमी झाले आहेत.

दरम्यान, या अपघातात १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मृतांमध्ये महिला व लहान मुला-मुलींचा समावेश आहे. सायंकाळपर्यंत ८ जणांचे मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आले, तर ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त वाहन विहिरींमधून बाहेर काढण्याचे काम सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होते. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेमुळे पंढरपूर तालुक्यातील रांझणी गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अपघात घडल्यानंतर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार उत्तम जानकर तसेच माजी आमदार राम सातपुते घटनास्थळाकडे रवाना झाले, तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रकरणी कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. मृतांमध्ये इंदुबाई दशरथ बावचे (६०), पूजा अमोल सातोरे (२३), पूजा बालाजी बावचे (२७),अश्विनी संदीप बावचे (२७), संस्कार संदीप बावचे (१४), संस्कृती संदीप बावचे (१४), आरव अमोल सातोरे (८) आणि समर्थ बालाजी बावचे (६ महिने) यांचा समावेश आहे, तर सागर सावकार चौगुले (२५), संदीप दशरथ बावचे (३६), बालाजी दशरथ बावचे (३२), जीया बालाजी बावचे (२ वर्षे, ५ महिने ), शशिकला पोपट जाधव (५०) अशी अपघातात जखमी झालेल्यांची नावे आहेत.

# ‘पोक्सो’ कायद्याअंतर्गत पाठलागाच्या गुन्ह्यात आरोपीला जामीन मंजूर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने २७ मे २०२६ रोजी वरूड पोलीस स्टेशन मध्ये दाखल झालेल्या भारतीय न्याय संहिता कलम ७८ व पोस्को ११ (४), १२ गुन्ह्यात आरोपी राम कनिरे (२०) रा. खैरगाव याला अटक करून अमरावती येथील कारागृहात पाठविण्यात आले होते. सदर आरोपीचे जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय वरूड येथे दाखल करण्यात येऊन न्यायाधीश यांनी जामीन अर्जाला मंजुरी देऊन जामीन





मंजूर केला.

यावेळी आरोपीची बाजु अ‍ॅड.विनोद भोसे यांनी यशस्वी युक्तिवाद करुन मांडली. सरकारी पक्षाने गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेता व भविष्यात होऊ शकणाऱ्या पुनरावृत्तीचा संशय व्यक्त करत आरोपीला जामीन नाकारला जाण्याचा युक्तिवाद केला. आरोपीचे वकील अ‍ॅड.विनोद भोसे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास काही महत्त्वाचे तथ्य आणुन दिले ज्यामध्ये आरोपीचे वय व सुरू असलेले शिक्षण सोबतच आरोपी व पिडीतेचे असलेले जुने संबंध आणि पिडीतेची पोलिसात तक्रार करताना केलेली दिरंगाई प्रामुख्याने मांडले. सदर खटला व न्यायालयीन कामकाजात अ‍ॅड.शांतीभुषण छांगाणी, अ‍ॅड.निलेश ठाकरे, अ‍ॅड.पवन वाडीवे, अ‍ॅड.पी.बी.कोल्हारे यांनी देखील सहकार्य केले.

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्य रक्तदान शिबीर

## रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्थेचा उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्था द्वारा जागतिक रक्तदाता दिनानिमित्य रक्तदान शिबिराचे आयोजन कुबडे हॉस्पिटल येथिल लाईफलाईन स्टोरेज सेंटर येथे करण्यात आले.

यावेळी रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर पुरवठा व्हावा, याकरिता अमुल्य सहकार्य केले. रक्त संकलनाचे कार्य लाईफलाईन रक्त केंद्र नागपुर यांनी केले.





याप्रसंगी रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र शेटीये, सचिव कैलास उपाध्याय, पंकज लेकुरवाळे, लंकेश्वर उमक, अक्षय वैद्य, प्रतापसिंह बेलोदे, नितीन आंजीकर, पवन बेलसरे, मंगेश देवते, विजय चोपडे, शेख नावेद तसेच लाईफलाईन रक्त केंद्राचे मंगेश भोंडे, धीरज खरवडे प्रामुख्याने उपस्थित होते.




**वरूड** : ग्रामीण रुग्णालयासह व्यक्तिगत विविध पुरस्कार प्राप्त ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खासदार सुप्रिया सुळे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, खासदार अमर काळे, बळवंत वानखडे, माजी आमदार गिरीश गांधी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# नंदकिशोर महाजनांच्या उमेदवारीवरून गिरीश महाजन अन रक्षा खडसे यांच्यात जुंपली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगावमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. जळगावमध्ये महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्या उमेदवारीवरून चक्क भारतीय जनता पक्षाच्याच दोन बड्या मंत्र्यांमध्ये मतभेद असल्याचे समोर आले आहे. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांच्यातील हा वाद आता राजकीय वतुर्ळात मोठ्या



चर्चेचा विषय बनला आहे.

नंदकिशोर महाजन यांना शेवटच्या क्षणी महायुतीकडून उमेदवारी जाहीर झाली होती. ही उमेदवारी रक्षा खडसे यांच्या प्रयत्नातून मिळाल्याची चर्चा राजकीय क्षेत्रात रंगली होती. याच चर्चेबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना दोन्ही नेत्यांमधील अंतर्गत वाद आणि मतभेद चव्हाट्यावर आले आहेत.

केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांचा दावा काय? केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या की, उत्तर महाराष्ट्र व जळगाव जिल्ह्याचा कोणताही निर्णय नेहमी गिरीश महाजन यांनी घेतला आहे. विधान परिषदेचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्या उमेदवारीबाबतचा निर्णय हा ही मंत्री गिरीश महाजन यांचा आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. रक्षा खडसे यांच्या या वक्तव्यामुळे नंदकिशोर महाजन यांच्या उमेदवारीची संपूर्ण जबाबदारी गिरीश महाजन यांच्यावर ढकलली गेल्याचे बोलले जात होते.

# जामगाव महेंद्रीचा दीपक झाला पोलिस उपनिरिक्षक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे हस्ते गौरव

**वरूड** – तालुक्यातील जामगाव महेंद्री या खेड्यागावातील दीपक परेती या आदिवासी समाजातील तरुणाने थेट पोलिस उपनिरिक्षक पर्यंत मजल गाठल्यामुळे तालुक्याच्या वैभवात मोठी भर पडली. त्यामुळे या तरुणाचा त्याची पत्नी प्रियंका परतेती हिच्यासह सपत्नीक भव्यदिव्य सत्कार करण्यात आला.

हा सोहळा पाहण्यासाठी तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते. महेंद्री ॲग्रो टुरिझम हे पर्यटन क्षेत्र म्हणुन ओळखले जाते. लगतच पोलिस उपनिरिक्षक दीपक विश्वेश्वर परतेती यांचे स्वगृह जामगाव महेंद्री गाव आहे. दीपक परतेती पी.एस.आय. झाल्याची वार्ता संपूर्ण तालुक्यात कळताच गावकऱ्यासह तालुक्यात उल्हासाचे वातावरण निर्माण





झाले. महेंद्री ॲग्रो टुरिझमचे संचालक विजय श्रीराव, पहाट पक्षी मित्र मंडळ वरुड यांनी सत्कार सोहळा आयोजित केला. आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नितीन खेरडे यांच्यासह माजी पं.स.सदस्य राजेंद्र केदार, निळकंठ उर्फ बाळासाहेब मुरुमकर, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे, माजी जि.प.सदस्य राजश्री श्रीराव यांच्यासह तालुक्यातील इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत जामगावात भव्य रॅली काढून गावकऱ्यांनी परतेती यांचे जंगी स्वागत केले. हा सत्कार सोहळा माझ्यासाठी अविस्मरणीय असुन माझ्याच स्वगृहात हा सोहळा पाहण्यासाठी तालुक्यातील मान्यवर मंडळी आली. त्यांचे ऋण विसरणे कदापी शक्य होणार नाही, या सत्कार सोहळ्याने मी भाराऊन गेलो आहे, असे मत पोलिस उपनिरिक्षक दीपक परतेती यांनी सत्कार समारंभावेळी उत्तर देतेवेळी व्यक्त केले. सत्कार सोहळ्याचे संचालन प्रा.कमलनारायण उईके यांनी केले.

# शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन ठाणेदारपदी राहुल गवई रुजु

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## दिपक महाडिक यांची अकोल्यातील मुर्तीजापुर ग्रामीण मध्ये बदली

**वरूड** – शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचे ठाणेदार दिपक महाडिक यांच्या प्रशासकीय बदलीनंतर रिकाम्या झालेल्या ठाणेदार पदाची सुत्रे सहाय्यक पोलिस निरीक्षक राहुल गवई यांनी हाती घेतली आहेत. ११ जून रोजी सायंकाळी त्यांनी अधिकृतपणे शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचा पदभार स्विकारला.

तत्कालीन ठाणेदार दिपक महाडिक यांनी वरुड तालुक्यात अविरत ४ वर्षे सेवा दिली. यात त्यांनी सुरुवातीची दोन वर्षे वरुड पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक म्हणून तर पुढील २ वर्षे शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशनचे ठाणेदार म्हणुन उत्कृष्ट




कामकाज पाहिले. या ४ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानंतर त्यांची अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर ग्रामिणमध्ये प्रशासकीय बदली करण्यात आली आहे. महाडिक यांच्या बदलीनंतर वरुड पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवहरी सरोदे यांनी ४ ते १० जून या कालावधीत शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला होता. दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सरोदे यांची ही कुऱ्हा पोलिस ठाण्यात प्रशासकीय बदली झाली. आता नवनियुक्त ठाणेदार राहुल गवई यांनी ११ जून रोजी पदभार स्विकारला. राहुल गवई हे २०१३ च्या बॅचचे पी.एस.आय.आहेत. त्यांचा पोलिस दलातील अनुभव दांडगा असुन त्यांनी यापूर्वी विविध जिल्ह्यांत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. २०१३ मध्ये धुळे येथे पहिल्यांदा कर्तव्य पार पाडले. २०१९ ते २०२२ नाशिक येथे सेवा. २०२२ ते २०२३ पदोन्नतीवर रिसोड (वाशीम) येथे बदली. २०२३ ते २०२५ अमरावती ग्रामीण अंतर्गत शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार म्हणुन कर्तव्य बजावले. जुलै २०२५ ते जून २०२६ मोर्शी येथे सहाय्यक पोलिस निरीक्षक म्हणुन कार्यरत. आता मोर्शी येथुन बदली झाल्यानंतर गवई यांनी शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचे ठाणेदार म्हणुन पदभार स्विकारुन आपल्या नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'टनल हूड' तंत्रज्ञानाचा प्रथमच वापर : बुलेट ट्रेन प्रकल्पामधील पर्वतीय बोगद्यांसाठी उपयुक्त

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्ग पर्वतीय भागातून जात आहे. या मार्गामध्ये राज्यातील सात आणि गुजरातमधील एक अशा एकूण आठ पर्वतीय बोगद्यांचा समावेश आहे.





या सर्व बोगद्यांच्या दोन्ही टोकांवर टनल हूड तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला गती आली आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात येताच या मार्गावरून ताशी ३२० किलोमीटर वेगाने ट्रेन धावण्याचे नियोजन आहे. त्यामुळे वेगाने धावणारी बुलेट ट्रेन जेव्हा बोगद्यात प्रवेश करते, तेव्हा ती मोठ्या प्रमाणात हवा पुढे ढकलते. यातून बोगद्यामध्ये दाब लहरी निर्माण होतात. या दाब लहरींचे योग्य व्यवस्थापन न झाल्यास ट्रेन बोगद्यातून बाहेर पडताना मोठ्या स्फोटासारखा आवाज निर्माण होऊ शकतो. टनल हूड हे मोकळ्या वातावरण आणि बोगद्याच्या मर्यादित जागेदरम्यान संक्रमण क्षेत्र म्हणून काम करते. त्यामुळे हवेचा प्रवाह अधिक नियंत्रित होतो, दाबातील अचानक बदल कमी होतात आणि संपूर्ण प्रणालीची वायुगतिकीय कार्यक्षमता सुधारते. हे तंत्रज्ञान बुलेट ट्रेनच्या प्रकल्पात वापरण्यात येत आहे. यामुळे वेगाने धावणाऱ्या बुलेट ट्रेनच्या सुरक्षित आणि कार्यक्षम संचालनास मदत होईल.




**वरुड :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांना वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ अकोलाचे कार्यकारी परिषद सदस्य मोरेश्वर वानखडे व कृषि उत्पन्न् बाजार समिती माजी संचालक नितीन निस्वादे.

# दिल्लीकरांना दिलासा! नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणांना सुरुवात

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**दिल्ली** – दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी उत्तर प्रदेशातील जेवर येथे उभारलेल्या नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोमवारी व्यावसायिक उड्डाण सेवांना अधिकृत सुरुवात झाली. लखनऊहून आलेल्या इंडिगोच्या विमानाने या विमानतळावर पहिले लँडिंग करत इतिहास रचला. उद्घाटन उड्डाणात विमानतळ प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या १७० शेतकऱ्यांचाही सहभाग होता. विशेष म्हणजे, विमानतळासाठी जमीन देणारे १७० शेतकरी या पहिल्या विमानातील प्रवासी होते.






ग्रीनफिल्ड स्वरूपात उभारण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी विमानतळ प्रकल्पासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. लखनऊच्या चौधरी चरण सिंह आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आलेले इंडिगोचे विमान नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणारे पहिले व्यावसायिक विमान ठरले. ६ई-२२७८ या क्रमांकाचे विमान सकाळी विमानतळावर उतरले. त्याचे पारंपरिक वॉटर कॅनन सलामी देऊन स्वागत करण्यात आले.

# अर्ज अवैध ठरवताना अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांना 'मिरगी' आली होती का?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## बाजोरिया पिता-पुत्रांनी पुरावे समोर ठेवून केले गंभीर आरोप

***अमरावती*** – विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत आता एक मोठा ट्विस्ट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवसेनेचे माजी आमदार विप्लव बाजोरिया यांचा अपक्ष म्हणून भरलेला उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी रद्द केला होता. या रद्द केलेल्या अर्जावरून आता माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया आणि विप्लव बाजोरिया या पिता-पुत्रांनी निवडणूक प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, काही खळबळजनक पुरावे समोर आणले आहेत.



अमरावतीचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी हे 'मॅनेज' असल्याचा घणाघाती आरोप बाजोरिया पिता-पुत्रांनी 'एबीपी माझा'शी बोलताना केला आहे. इतकेच नव्हे तर, अमरावतीची संपूर्ण निवडणूकच मॅनेज झाली असून विप्लव बाजोरिया यांचा अर्ज बाद करण्यासाठी काँग्रेस आणि भाजप हे दोन्ही विरोधी पक्ष एकत्र आल्याचा दावाही त्यांनी केला आहे. काय आहेत बाजोरिया पिता-पुत्रांचे दावे आणि पुरावे?

विप्लव बाजोरिया यांचा उमेदवारी अर्ज ज्या त्रुटी दाखवून बाद करण्यात आला, अगदी तशाच पद्धतीने भरलेले इतर १७ मतदारसंघांतील उमेदवारांचे अर्ज वैध ठरवण्यात आले आहेत, असा दावा बाजोरिया यांनी केला आहे. त्यांनी अमरावती, वर्धा, जळगाव, ठाणे, परभणी आणि हिंगोली यांसह इतर मतदारसंघांतील तब्बल १७ ते २० उमेदवारांच्या अर्जांचे नमुने पुरावे म्हणून गोळा केले आहेत.

अमरावती, वर्धा, जळगाव, ठाणे, परभणी-हिंगोली यांसह इतर काही महत्त्वाच्या मतदारसंघातील महत्त्वाच्या उमेदवारांचे उमेदवारी अर्ज. यातील बिनविरोध निवडून आलेल्या यवतमाळ, वर्धा आणि ठाणे मतदारसंघातील अनुक्रमे दुष्यंत चतुर्वेदी, अरुण लखानी आणि रवींद्र फाटक यांचे उमेदवारी अर्ज आपल्याच उमेदवारी अर्ज प्रमाणे भरल्याचा बाजोरियांचा दावा. यासोबतच हिंगोली, जळगाव येथील काही महत्त्वाच्या उमेदवारांचे उमेदवारी अर्ज. यातील काही महत्त्वाच्या उमेदवारांनी माहितीचे अनेक रकाने रिकामे ठेवल्याचं आणून दिलं निदर्शनास. आपल्या अर्जात माहितीचा कोणताही रकाना रिकामा नसल्याचा केलं स्पष्ट. यासोबतच शपथपत्र आणि त्यावरच्या स्वाक्षऱ्या आणि शिक्के अतिशय अचूक आणि बरोबर असल्याचा दावा.१७ मतदारसंघातील आतापर्यंत जवळपास वीस उमेदवारांचे उमेदवारी अर्ज पुरावे म्हणून केलेत गोळा.१७ तारखेच्या सुनावणीवेळी ३० उमेदवारांच्या उमेदवारी अर्जाचे नमुने पुरावे म्हणून उच्च न्यायालयासमोर सादर करणार.

# कोकणात विनाशकारी प्रकल्पांना 'नो एन्ट्री': मुंबईकर कोकणवासीयांच्या मेळाव्यात एकजुटीने ठराव मंजूर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील लोटे परशु-राम एमआयडीसीमध्ये असलेल्या लक्ष्मी ऑर्गेनिक कंपनीत पीफास हे जीवघेणे रसायन बनवले जाते. ज्यामुळे मानवी आरोग्य आणि पर्यावरण धोक्यात आले आहे. ही कंपनी बंद करावी. त्याचप्रमाणे रत्नागिरीतील बारसू आणि पूर्णगड तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथील प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्प रद्द करावेत आणि कोकण प्रदूषित होण्यासाठी वाचवावे, यासाठी मुंबईतील शेकडो कोकणवासीयांनी शनिवारी भव्य एकजूट दाखवत या विनाशकारी प्रकल्पांना सरसकट नामंजूर केले.



दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील सुरेंद्र गावस्कर सभागृहात जनता दल सेक्युलर, कोकण जनविकास समिती आणि मूलभूत अधिकार संघर्ष समिती यांच्या वतीने बोलावण्यात आलेल्या मेळाव्यात 'कोकणची कैफियत' हा परिसंवाद झाला. यावेळी अणुऊर्जा अभ्यासक डॉ.मंगेश सावंत, प्रा. अशोक रानडे, सामाजिक कार्यकर्ते अशोक जाधव, प्रकाश लव्हेकर, जनता दल राज्य कार्याध्यक्ष प्रभाकर नारकर यांनी मार्गदर्शन केले. मंजूर केलेले ठराव लक्ष्मी ऑर्गेनिकवर तत्काळ बंदी घालावी. लोटे परशुराम परिसर आणि कंपनीतील घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत असलेल्या तळोजा परिसरातील नागरिक आणि कामगारांची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

# ८ कंपन्यांना नोटीस : दिशाभूल करणाऱ्या दाव्यांप्रकरणी एफएसएसएआयची कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याचे उल्लंघन करून उत्पादनांच्या पॅकेजिंग, लेबल आणि ब्रँडच्या नावांद्वारे ग्राहकांची दिशाभूल केल्याप्रकरणी आठ अन्न उत्पादक कंपन्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने रविवारी ही कारवाई केली. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे या सर्व कंपन्यांना नोटीस जारी करण्यात आली असून प्राधिकरणाने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून या कारवाईची घोषणा केली आहे. प्राधिकरणाने ज्या कंपन्यांना नोटीस बजावली आहे, त्यामध्ये इमामी हेल्दी अँड टेस्टी, हेल्थ एड, ट्रूव्ही, द हेल्दी फॅक्टरी, हेल्दी मास्टर, हेल्दी चॉईस, प्लान बी आणि न्यूहर्ब्स या ब्रँडचा समावेश आहे. या कंपन्यांनी आपल्या ब्रँडची नावे, व्यापारी नावे आणि उत्पादनांचे दावे याद्वारे ग्राहकांची दिशाभूल केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या कारवाईत कोलकाता येथील इमामी ग्रुपची खाद्यतेल कंपनी असलेल्या इमामी हेल्दी अँड टेस्टी या मोठ्या ब्रँडचाही समावेश आहे. या कंपनीचे व्यापारी नाव ग्राहकांची दिशाभूल करणारे असून ते एफएसएसएआयच्या नियमांचे थेट उल्लंघन करणारे असल्याचे प्राधिकरणाने म्हटले आहे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३७८/२०२६** **ने.ता.११/०६/२०२६**

**अर्जदार :-**

कु.अक्षरा पंकज मकासरे, वय अं.१६ वर्ष, धंदा-शिक्षण

अ.पा.क.कांचन विनोद पहाडे, वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम

रा.सुरगांव सेलु, ता.सेलु, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** ताराबाई ज्ञानेश्वरराव मकासरे, वय अं.६० वर्ष धंदा-शिक्षण, रा.नागपूर, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पंकज ज्ञानेश्वर मकासरे, रा.हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१२/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२९/२०२६** **ने.ता.२३/०६/२०२६**

**अर्जदार :-**

सुशिला मोहन पदामे

वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम

रा.शहापूर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत भुरी मारोतराव युवनाते व मय्यत मारोतराव सद्दु युवनाते, रा.खडका, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३२१/२०२६** **ने.ता.२४/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती आशा प्रयाग देशमुख, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम, २) भुपेश प्रयागराव देशमुख, वय अं.४२ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ व २ रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत प्रयाग रामकृष्ण देशमुख, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# शेतकऱ्यांच्या भल्यासाठीच पुढील आयुष्य खर्ची घालेल

**श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांचे प्रतिपादन**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**वरुड** – मी गेल्या अनेक वर्षांपासून शरद पवार यांच्यासोबत आहे आणि भविष्यातही त्यांच्यासोबतच राहील कारण त्यांच्यासारखं नेता मी बघितला नाही, जेव्हा जेव्हा संधी मिळाली तेव्हा तेव्हा शेतकऱ्यांच्या भल्यासाठीच त्यांनी आपले प्रयत्न केले, मनमोहन सिंग देशाचे पंतप्रधान असतांना आणि शरद पवार कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिली होती एवढेच नव्हे तर माझा पराभव झाल्यानंतर मला बळ देण्याचे काम शरद पवार यांनीच केले आहे त्यामुळे मी त्यांना विसरणे कदापीही शक्य नाही, माझ्या सेवानिवृत्ती संदर्भात वारंवार बोलले जात असताना मी यापुढेही शेतकऱ्यांच्या भल्यासाठीच आयुष्य खर्ची घालेल व काम करत राहील जेव्हा जेव्हा शक्य झाले तेव्हा तेव्हा सर्वसामान्यांशी संपर्क ठेवेल, पण राजकारणातून सेवानिवृत्ती घेणार नाही, असे प्रतिपादन सत्कारमुर्ती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी कृषीमंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष तथा राज्याचे माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख यांचा अमृत महोत्सव शहरातील श्रध्दा राधा सेलीब्रेशन हॉल येथे अत्यंत उत्साहात आयोजीत करण्यात आला होता.

या प्रसंगी व्यासपिठावर हर्षवर्धन देशमुख, अर्ध्यांगिनी निर्मला देशमुख होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गृहमंत्री तथा काटोलचे माजी आमदार अनिल देशमुख होते तर प्रमुख अतिथी म्हणुन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे, वर्धेचे खासदार अमर काळे, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार गिरीश गांधी, मोर्शीच्या नगराध्यक्ष प्रतिक्षा गुल्हाने, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गजानन पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, संचालक केशवराव मेटकर, हेमंत काळमेघ, केशवराव गावंडे, सुरेश खोटरे, सुभाष बन्सोड, विजय ठाकरे, डॉ.अंबादास कुलट, विजय ठोकळ, डॉ.अमोल महल्ले, ऋषीकेश पोहरे, आदिती पोहरे, कृषि रत्न विजय अण्णा बोराडे, सलील देशमुख, माजी जि.प.सदस्य संगिता ठाकरे, वर्षा शामकुळे, अतूल वांदीले, अनिल जळमकर, प्रियदर्शन देशमुख, अतुल वांदीले, सुनिल देशमुख यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलतांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आदरणीय भैय्यासाहेब हे आमचे नेते आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाची आम्हाला आवश्यकता आहे, त्यामुळे त्यांनी ७५ वी ओलांडली असली तरी सेवानिवृत्ती घेऊ नये, तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये युवकांना संधी द्यावी जेणेकरून महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांकाची असणारी ही संस्था अधिक प्रगतीकडे जाईल, अशी अपेक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी बोलतांना खासदार अमर काळे यांनी भैय्यासाहेब अतिशय आदर्श आणि कितीही नुकसान झाले तरी तत्त्व न सोडणारे नेते आहेत, आजच्या उपस्थितीवरून त्यांची आजही किती पकड आहे हे लक्षात येते, माझ्या लोकसभा निवडणुकीमध्ये माझा जो विजय झाला त्यामध्ये भैय्यासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे, त्यामुळे भैय्यासाहेबांनी सेवानिवृत्ती संदर्भात कुठलाही निर्णय घेऊ नये त्यांच्या मार्गदर्शनाची आम्हाला सक्त गरज आहे, असे सांगितले तर मी अमरावतीला असताना भैयासाहेबांशी अनेकदा संबंध आला, ते अतिशय तत्ववेत्तेआणि प्रामाणिक माणुस म्हणुन त्यांच्याकडे बघितले जाते, त्यांनी वयाची शंभरावी ओलांडावी जेणेकरून त्यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळत राहील आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवुन आम्ही पुढे जात राहु, असे प्रतिपादन खासदार बळवंत वानखडे यांनी केले.

याप्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच माजी सचिव तथा सेवानिवृत्त अधिकारी शेषराव खाडे तथा वरुडच्या ग्रामीण रुग्णालयाला अनेक पुरस्कार प्राप्त करुन देणारे वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांचा गौरव करण्यात आला. यावेळी हर्षवर्धन देशमुख व निर्मला देशमुख यांचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह देवुन मान्यवरांचे हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी नगरसेवक महेंद्र देशमुख, प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.विजय देशमुख, माजी जि.प.सभापती सुशिला कुकडे, माजी सभापती कमलाकर पावडे, नारायण बहुरुपी, अचना यावले, राजाभाऊ कुकडे, रामदास कडू, माजी न.प.सभापती विलास उघडे, माजी शहराध्यक्ष शैलेश देशमुख, उल्हास तडस, माजी नगरसेवक संजय कानुगो, माजी सरपंच गणेश देशमुख, मनोज पेलागडे, रविंद्र शेळके, किशोर गोमकाळे, प्रताप वानखडे, सोपान ढोले, सुधाकर डाफे, विरेंद्र देशमुख, रविंद्र सुरजूसे, किसना सोनारे, पिंटु ताथोडे, चंद्रशेखर गायकवाड, मनिष कडू, माजी नगराध्यक्ष जगदीश काळे, जनता शिक्षण संस्थेचे सचिव मोहन गणोरकर, सरपंच रुपेश फुसे, रविंद्र वाहाणे, दिपक काळे, नितेश चवरे, नवनीत वानखडे, दिलीप ठाकरे, जगदीश देशमुख, दिलीप भोंडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माजी जि.प.सभापती गिरीश कराळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र बहुरुपी, शहराध्यक्ष डॉ.प्रविण चौधरी, माजी शहराध्यक्ष जितेन शाह, आशिष श्रीराव, माजी नगरसेवक संजय डफरे, गौस अली, सुरज वडस्कर, शुभम पावडे, विजय जिचकार, सुनिल वागद्रे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन किर्ती काळमेंघ, प्रास्तविक शेषराव खाडे तर उपस्थितांचे आभार डॉ.प्रदीप कुऱ्हाडे यांनी मानले.

---

**शेतकऱ्याचा मोबाईल चोरुन बँक खात्यातून**

## १ लाख ८२ हजार लंपास : अज्ञात भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – मोबाईल चोरीला गेल्याची संधी साधत एका अज्ञात चोरट्याने वृद्धाच्या बँक खात्यातून तब्बल ३४ वेळा ऑनलाइन व्यवहार करुन १ लाख ८२ हजार रुपये लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रशेखर एकनाथराव चरपे रा. विष्णोरा यांचा एंड्रॉइड मोबाईल २३ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान वरुड बस स्टॉपच्या पश्चिम दिशेला १ किमी अंतरावर असताना कुठेतरी चोरीला गेला होता. तक्रारदाराचा मोबाईल चोरी केल्यानंतर अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मालकीच्या मोबाईलचा आणि त्यामधील बँक पिन/पासवर्डचा गैरवापर केला. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मोर्शी शाखेतील खाते क्रमांक ११३९५८४२३०० मधून आपणच मुळ खातेदार असल्याचे भासवुन बँकेच्या ऑनलाईन यंत्रणेची फसवणुक केली. आरोपीने अत्यंत चलाखीने तब्बल ३४ वेळा वेगवेगळी रक्कम काढून एकूण १ लाख ८२ हजार रुपये खात्यातुन वळविले आणि फिर्यादीचे मोठे आर्थिक नुकसान केले.

आपली फसवणुक झाल्याचे लक्षात येताच चंद्रशेखर चरपे यांनी पोलीस स्टेशन गाठून फिर्याद दिली. त्यांच्या जबानी रिपोर्टवरुन वरुड पोलिसांनी कलम ३४२/२६, ६६(क) आणि ३०३ अन्वये ऑनलाईन आर्थिक फसवणुक केल्याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु केला आहे.

---

## ‘नॅशनलिस्ट सिटीझन्स पार्टी’त तृणमूलचे बंडखोर विलीन होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – तृणमूल काँग्रेसमध्ये (टीएमसी) मोठी बंडाळी झाली असून, पक्षांतर्गत कलह आता थेट संसदेपर्यंत पोहोचला आहे.

तृणमूल बंडखोर खासदारांनी त्रिपुराच्या ‘नॅशनलिस्ट सिटीझन्स पार्टी’सोबत विलीनीकरणाची घोषणा केली आहे. पक्षांतर बंदी कायद्यापासून वाचण्यासाठी बंडखोर खासदारांनी हे पाऊल उचलले आहे. आपली खासदारकी वाचवण्यासाठी ही रणनीती आखण्यात आली आहे. या घोषणेपूर्वी, रविवारी काकोली घोष दस्तीदार, सुदीप बंदोपाध्याय आणि शताब्दी रॉय यांच्यासह तृणमूलच्या बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. या बंडखोर खासदारांनी लोकसभेत आपल्यासाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. बंडखोर गटाचा दावा आहे की, त्यांच्यासोबत टीएमसीचे २८ पैकी २० ते २२ लोकसभा खासदार आहेत.

---

**रोशनखेडा गावात चारित्र्याच्या संशयावरुन**

## तरुणाला काठ्या आणि बॅटने बेदम मारहाण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रोशनखेडा गावात चारित्र्याच्या संशयावरून एका २८ वर्षीय तरुणाला तीन जणांनी काठ्या आणि बॅटने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वरुड पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रणव दिलीप बडोदेकर, रा.रोशनखेडा हा ११ जून रोजी रात्री ८:३० ते ९ वाजताच्या दरम्यान आंबेडकर चौकात बसला होता. दरम्यान, त्याच्या भावाचा फोन आला की, तिघे जण काठ्या व बॅट घेऊन आले असुन शिवीगाळ करत तुला बोलवत आहेत.

त्यानंतर आरोपींनी प्रणवला पाहताच शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. प्रणवने काय झाले? असे विचारले असता, आरोपींनी तुझे दिगंबरच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध आहेत, असा आरोप केला. याच कारणावरुन चिडून आरोपींनी प्रणवच्या डाव्या पायाच्या मांडीवर बॅटने जोरात मारहाण केली, ज्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. इथून जाताना दिसला तर पुन्हा मारहाण करु, अशी धमकीही आरोपींनी दिली.

या प्रकरणी प्रणव बडोदेकर याच्या तक्रारीवरुन पोलिसांनी अनिल वासुदेव नेवारे, दिगंबर वासुदेव नेवारे, वासुदेव नेवारे यांच्या विरुद्ध कलम ११८ (१), ३५२, ३३१ (३), आणि ३०५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास वरुड पोलिस करत आहेत.

